# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

## महाराष्ट्र प्रदेश

**उदयकुमार निंबाजी आहेर**
**प्रदेश उपाध्यक्ष**

दिनांक : १३/०७/२०२६

प्रति
**मा.ना.श्रीमती सुनेत्रावहिनी पवार**
राष्ट्रीय अध्यक्षा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.
तथा उपमुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राष्ट्रीय स्तरावर विस्तारित करण्याच्या हेतूने पक्षातील सर्वमान्य युवा नेतृत्व मा.खा.श्री.पार्थदादा पवार यांचा केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश होण्यासाठी शिफारस करणे बाबत.**

**(टीप- सदरचा प्रस्ताव हा स्वर्गीय अजितदादा व उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी यांच्या ज्येष्ठ चिरंजीवांची भलामन करून पक्ष नेतृत्वाचे आशीर्वाद मिळविणेसाठी दिलेला नसून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राष्ट्रीय स्तरावर खऱ्या अर्थाने वाढविणे व रुजविणेसाठी माझ्या नेतृत्वाखाली प्रवेश केलेल्या २३ जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांसह तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांसोबत केलेल्या चर्चेनंतरचा तर्कशुद्ध प्रयत्न आहे. त्यामुळे माझ्या प्रस्तावातील सर्व मुद्द्यांना दोन-तीन वेळा वाचून सखोल विचार करून त्यावर अवलंब करावा, ही विनंती.)**

महोदया,

येत्या काही दिवसात केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार होऊ घातल्याच्या बातम्या प्रसार माध्यमातून कानावर येत आहेत. स्व.अजितदादा पवार यांच्या निधनाच्या नंतर आपण तसेच पार्थदादा व जयदादा पक्षाला सावरण्याचा पुरेपूर आणि सकारात्मक प्रयत्न करित आहात, याचा आम्हा पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना अभिमान आहे. अनेकांच्या कल्पनेप्रमाणे आपण "गुंगी गुडिया" बनून राहिल्या नाहीत याचाही सार्थ अभिमान आहे. महाराष्ट्रातील तसेच देशातील तमाम कार्यकर्त्यांना आपण आधार देत आहात.

शिवछत्रपती, शाहू, फुले व आंबेडकर यांच्या विचाराने तसेच यशवंतराव चव्हाण साहेबांच्या घालून दिलेल्या आदर्शांवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आपल्या नेतृत्वाखाली वाटचाल करित आहे. स्व. अजितदादा यांच्या निधनानंतर राज्यातील राजकारण बदलू पहात आहे. त्याचे परिणाम आपसुकच देशाच्याही राजकारणात बघायला मिळत आहेत. अशा राजकिय वातावरणात केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार किंवा फेरबदल होऊ घातला आहे आणि हा फेरबदलच आपल्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी

..2..

काँग्रेस पक्षाला देश पातळीवर विस्तारित करण्यासाठीची योग्य संधी आहे, असे मला वाटते. या होवू घातलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळ फेरबदलात किंवा विस्तारात आपल्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने देशपातळीवर पक्ष विस्तारित करण्याच्या हेतूने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेतृत्व मा.खा.श्री. पार्थदादा पवार यांना केंद्रीय मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून समाविष्ट करण्याच्या दृष्टिकोनातून आपण मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी साहेब, मा. गृहमंत्री श्री. अमितजी शहा साहेब, मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याकडे आग्रह धरावा. त्याची कारणे खालील प्रमाणे.

१) श्री. पार्थदादा हे खऱ्या अर्थाने २१ व्या शतकातील उमद्या तरुणांचे व्हिजनरि नेतृत्व आहे.

२) हिंदी आणि इंग्रजी या भाषांवर त्यांचे विशेष प्रभुत्व आहे. याचा उपयोग देशपातळीवर निश्चितपणाने सरकारला व पक्ष वाढीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला होईल.

३) पार्थदादा यांचे उच्च शिक्षण लंडन येथे झाले आहे. त्यामुळे जगभरात होणाऱ्या आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि इतरही क्षेत्रातील बदल तसेच नाविन्याबद्दल पार्थदादांना पूर्ण आकलन आहे.

४) २१ व्या शतकातील तरुणांचा चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाईल. त्यामुळे देशभरातील तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे आकृष्ट होण्यास मदत होणार आहे.

५) भारतीय जनता पार्टी देशातील सर्वात मोठा पक्ष आहे. याबद्दल आपल्या कुणाच्याही मनात अजिबातच शंका नाही. पण, त्याच सोबत शिव, शाहू, फुले व आंबेडकरांचा विचार मानणारा आपला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष देखील देशभरात वाढायला आणि रुजायला हवा जेणेकरून शिव, शाहू, फुले व आंबेडकर यांचा वैचारिक वारसा आपल्याला पार्थदादांच्या माध्यमातून देशभर घेऊन जाता येईल असा विचार करणे पक्ष व देश हिताचे आहे, गैर नाही. शेवटी आपण भारतीय जनता पक्षाचे मित्रपक्ष आहोत आणि भविष्यातही असणार आहोत.

६) मा.खा. श्री.पार्थदादा पवार यांच्याकडे राजकिय परिपक्वता नाही, असे चित्र निर्माण करण्याचे काम दुर्दैवाने मागील काळात झाले आहे. यामध्ये तुलना करून छत्रपती संभाजी महाराजांचे अनादर करण्याची धारिष्ट माझ्यासारखा शिवप्रेमी कदापिही करणार नाही. मात्र, इतिहासाकडून आपण नेहमीच काहीतरी शिकायला हवे. इतिहासात छत्रपती संभाजी महाराजांना देखील अशाच पद्धतीने राजकिय कामकाज जमणार नाही, असे सांगून किंवा बदनाम करून त्यांना स्वराज्याचे छत्रपती होण्यापासून रोखण्याचे काम त्या काळातील अनाजीपंतांनी केले होते. तसेच कृत्य आपल्यातीलच काही "अनाजीपंत" करत आहेत. पार्थदादा हे राजकीय दृष्ट्या पक्षाला किंवा जनतेला न्याय देऊ शकणार नाहीत असा भ्रम दुर्दैवाने आपल्यातीलच काही लोकांकडून पसरविला जात आहे. हे "ओपन सिक्रेट" आहे. फक्त 38 वर्षाचे वय असणाऱ्या युवा नेतृत्वाबद्दल असे गैरसमज पसरवून एखाद्याचे राजकिय

करियर सुरू होण्याआधीच संपविण्याचे पाप आदरणीय अजितदादांच्या निधनानंतर काही लोकांकडून जाणीवपूर्वक केले जात आहे. म्हणून पार्थदादांना केंद्रीय मंत्रिमंडळात त्यांचे कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी देऊन आरोप करणाऱ्यांना व गैरसमज पसरविणाऱ्यांना सडेतोड उत्तर आपण द्यायला हवे.

७) सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर जाणीवपूर्वक पार्थदादांना हिणवून त्यांचे 'मोरल डाऊन' करण्याचे काम जाणीवपूर्वक करण्यात आले. त्यामुळे त्यांना उचित ठिकाणी संधी देण्यात यावी याविषयी माझे सातत्याने स्वर्गीय अजितदादांसोबत बोलणे होत होते. स्वर्गीय दादांना देखील माझे सर्व मुद्दे पटले होते आणि त्यांनी देखील पार्थदादांना मोठी संधी देण्याचे ठरविले होते. दादांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न या निमित्ताने आपण पुढे नेऊन पूर्ण करावे.

८) देशातील तरुण वर्ग राजकारणापासून मोठ्या प्रमाणात दूर गेलेला आहे राजकीय घडामोडींमध्ये तरुण वर्गाला फारसा रस उरलेला नाही. हे खेदाने नमूद करावेसे वाटते. मात्र, अशा परिस्थितीत त्यांच्यातीलच एक तरुण "त्या" वर्गाला राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम आणि जबाबदारी पार्थदादा योग्य पद्धतीने पार पाडतील, असा मला विश्वास आहे.

तरी कृपया वरील मुद्द्यांचा व इतरही मुद्द्यांचा सांगोपांग विचार करून आपण पार्थदादा पवार यांना केंद्रीय मंत्रिमंडळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कॅबिनेट मंत्री म्हणून घेण्याची शिफारस मा. पंतप्रधान व इतर वरिष्ठ नेत्यांना करावी. ही विनंती.

आपला



**(उदयकुमार आहेर)**